# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of stolen property**

**Police Station** :- **Washim City**

**Date of Good Work done** :- **17/08/2022**

**Brief of the work done :-**

चेन स्नॅंचिंग प्रकरणातील सोनसाखळी चोरट्यांना वाशिम पोलिसांकडून अटक - 5 गुन्हे उघड.

## सोनसाखळी चोरांना डीबी पथकाने केले जेरबंद

**वाशीम, ता. १६ :** शहरात व जिल्ह्यात इतर ठिकाणी महिलांच्या गळ्यातील सोनसाखळ्या हिसकावून पळून जाणाऱ्या चोरट्यांना वाशीम शहर पोलिस ठाण्याच्या डिबी पथकाने जेरबंद केले आहे. या प्रकरणात दोन जणांना अटक करण्यात आली आहे.



वाशीम : जेरबंद केलेल्या सोनसाखळी चोरांसह डीबी पथक.

वाशीम शहरातील विजयालक्ष्मी राजुरवार या देव दर्शनासाठी गेल्या असता जुन्या पशुवैद्यकीय दवाखान्याजवळ मागून मोटार सायकलने येणाऱ्या दोन अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील सोन्याची पोथ हिसकावून पोबारा केला होता. या गुन्ह्याची नोंद शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली होती. जिल्हा पोलिस अधीक्षकांच्या मागदर्शनाखाली ठाणेदार रफिक शेख यांनी डिबी पथकाला तपासाचे आदेश दिले होते. सिसिटीव्ही फुटेज व माहितीच्या आधारे डिबी पथकाने चंदु बळीराम खिल्लारे उर्फ शेख इम्रान शेख इस्माईल रा. क्रांतीनगर वाशीम यास हिंगोली येथून ताब्यात घेतले असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली व सदरचा गुन्हा त्याचा पुतण्या दीपक उर्फ गोलू सुनिल खिल्लारे रा. भीमनगर वाशीम यांनी केल्याचे सांगीतले. तसेच गोलू खिल्लारे यांने मसला, पांगरी नवघरे येथून चोरून आणलेल्या मोटारसायकलवर वाशीम येथे गुन्हा केल्याची कबुली दिली. त्याचा साथीदार करण संतोष खडसे रा. पंचशिल नगर यालाही पोलिसांनी ताब्यात घेतले. सदर कारवाईत पोलिस अधिक्षक बच्चनसिंह, अप्पर पोलिस अधिक्षक गोरख भामरे, उपविभागीय पोलिस अधिकारी सुनिल पुजारी यांच्या मार्गदर्शनात डिबी पथकाचे सहाय्यक पोलिस निरीक्षक रमाकांत खंडारे , पोलीस नायक लालमनी श्रीवास्तव, रामकृष्ण नागरे, ज्ञानदेव म्हात्रे, विठ्ठल महाले, संदीप वाकुडकर यांच्या पथकाने केली आहे.